सकाळ



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागातील डॉ. जे. एफ. पाटील यांच्या शोकसभेत बोलताना डॉ. डी. टी. शिर्के. शेजारी व्ही. एन. पाटील, पी. एस. पाटील, डॉ. विद्या करीकट्टी.

# विद्यार्थीहित जोपासणारा शिक्षक कसा असावा याचे मूर्तिमंत उदाहरण : शिर्के

**कोल्हापूर, ता. १२ :** शिक्षक कसा असावा याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे प्रा. डॉ. जे. एफ. पाटील आहेत. अध्यापन करताना त्यांनी विद्यार्थीहित जपलेच. मात्र, निवृत्तीनंतरही ते शैक्षणिक क्षेत्रात काम करत राहले, अशी भावना डॉ. डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केली. अर्थशास्त्र विभागात जे. एफ. पाटील यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, विभागप्रमुख डॉ. विद्या करीकट्टी, डॉ. ज्ञानदेव तळुले, डॉ. सुभाष कोंबडे, डॉ. पी. एस. कांबळे, डॉ. भारती पाटील यांच्यासह कर्मचारी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
13 DEC 2022 पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. पाटील यांचे कार्य पूर्ण करणे हीच त्यांना श्रद्धांजली

**कोल्हापूर :** डॉ. जे. एफ. पाटील यांच्या जाण्याने शैक्षणिक, सामाजिक क्षेत्राची मोठी हानी झाली असून, त्यांचे स्वप्न असलेले भगवान महावीर अध्यासन इमारत उभारणीसारखी विविध कामे पूर्ण करणे हीच खरी त्यांना श्रद्धांजली ठरेल, असा सूर उपस्थित मान्यवरांमध्ये उमटला.

दिगंबर जैन बोर्डिंग येथे सोमवारी आयोजित डॉ. जे. एफ. पाटील यांच्या शोकसभेत शैक्षणिक, सामाजिक, व्यावसायिक क्षेत्रातील मान्यवरांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. त्यामध्ये सरांचे अपूर्ण कार्य पूर्ण करत त्यांना कार्यांजली देऊया, अशा भावना सर्वांनी व्यक्त केल्या. सभेला प्रमुख उपस्थिती प्रा. अशोक चौसाळकर, चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष संजय शेटे, सुरेश रोटे, प्रा. डॉ. विजय ककडे, व्यंकाप्पा भोसले, किसन कुराडे यांची होती.

डॉ. चौसाळकर म्हणाले, सरांचा विविध संघटनांशी जवळचा संपर्क होता. अर्थसंकल्पानंतरच्या विश्लेषणामध्ये ते नेहमी लोकांची बाजू मांडत. पुरोगामी चळवळीला त्यांनी भरीव योगदान दिले. यावेळी संजय शेटे, सुरेश रोटे, किसन कुराडे यांनी मते मांडली. यावेळी संदीप पाटील, धनंजय खामकर, चंद्रकांत निकाडे, हसन देसाई, बी. टी. रुपे, शिवाजी कुडूकर, अजित पाटील, रमेश पोवार, किरण पोवार, यश आंबोळे उपस्थित होते.

## विद्यापीठातील शोकसभेत श्रद्धांजली

दरम्यान, सोमवारी दुपारी शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागाच्या वतीनेही डॉ. जे. एफ. पाटील यांच्या शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. निशा पवार, डॉ. विजय ककडे, डॉ. भारती पाटील, पी. एस. कांबळे, सुभाष कोंबडे, राहुल म्होपरे, डॉ. विद्या कट्टी उपस्थित होते.

पुढारी

# विद्यापीठाने आध्यात्मिक तत्त्वज्ञान साहित्य पुरस्कार सुरू करावा : डॉ. कहाते

कोल्हापूर : संत साहित्याचे गाढे अभ्यासक सद्‌गुरू डॉ. गुरुनाथ मुंगळे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ पुरस्कार प्रदान करण्यासाठी सात लाखांचा निधी मुंगळे कुटुंबीयांच्या वतीने शिवाजी विद्यापीठास देण्याचे जाहीर केले. सात लाखांचा धनादेश सद्‌गुरू डॉ. गुरुनाथ मुंगळे यांच्या कन्या डॉ. गौरी कहाते यांनी कुलगरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला. यावेळी डॉ. कहाते यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. गुरुनाथ मुंगळे यांचे ६ ऑगस्ट २०२० रोजी निधन झाले, त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ विद्यापीठाने आध्यात्मिक तत्त्वज्ञान साहित्य पुरस्कार देऊन आध्यात्मिक क्षेत्रातील एकाचा गौरव करावा, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. अजय देशपांडे आदी उपस्थित होते.

पुण्यनगरी

# डॉ. मुंगळे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ विद्यापीठास सात लाखांचा निधी

**कोल्हापूर :** संत साहित्य व अध्यात्माचे गाढे अभ्यासक सद्गुरू डॉ. गुरुनाथ मुंगळे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ पुरस्कार प्रदान करण्यासाठी कुटुंबीयांनी शिवाजी विद्यापीठाकडे सात लाख रुपयांचा निधी दिला आहे. त्या अनुषंगाने लवकरात लवकर कार्यवाही करण्यात येईल, अशी ग्वाही कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी दिली.

डॉ. गुरुनाथ मुंगळे यांच्या कन्या डॉ. गौरी कहाते यांनी त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ शिवाजी विद्यापीठात 'स्व. सद्गुरू गुरुनाथ मुंगळे आध्यात्मिक तत्त्वज्ञान साहित्य पुरस्कार' प्रस्थापित करण्यासाठी सात लाख रुपयांच्या देणगीचा धनादेश कुलगुरू डॉ. शिर्के यांच्याकडे सुपूर्द केला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे आणि डॉ. अजय देशपांडे उपस्थित होते.

यावेळी डॉ. कहाते यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की, माझे वडील स्व. सद्गुरू डॉ. गुरुनाथ मुंगळे हे इंग्रजी आणि संस्कृत या दोन्ही विषयांतील तज्ज्ञ होते. डॉ. डी.वाय. पाटील अभिमत विद्यापीठाने (मुंबई) त्यांना डी.लिट. मानद पदवी प्रदान केली. त्याचप्रमाणे त्यांना कोल्हापूरभूषण, पुणेभूषण, ऋग्वेदभूषण आदी पुरस्कारांनीही सन्मानित करण्यात आले आहे. ६ ऑगस्ट २०२० रोजी त्यांचे निधन झाले. त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ शिवाजी विद्यापीठामार्फत 'आध्यात्मिक तत्त्वज्ञान साहित्य पुरस्कार' देण्यात यावा, असा आमचा मानस आहे.

पुढारी



**कोल्हापूर : अविष्कार संशोधन स्पर्धेमधील विजेत्यांच्या सत्कारप्रसंगी प्रभारी कुलसचिव डॉ.व्ही.एन.शिंदे. प्रा. किरणकुमार शर्मा, डॉ. पी. टी. गायकवाड, डॉ.एस.एस.महाजन.**

# शाश्वत विकास काळाची गरज

## डॉ. व्ही.एन. शिंदे; अविष्कार स्पर्धा बक्षीस वितरण समारंभ

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शाश्वत विकास हा सध्याच्या काळाची गरज आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांनी शाश्वत विकास म्हणजे काय हे त्यांच्या कार्यातून दाखवून दिले आहे. विद्यार्थ्यांनी भरीव संशोधन करावे. संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शिवाजी विद्यापीठ पाठीशी आहे, असे प्रतिपादन प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी छत्रपती शाहू सभागृहात आयोजित अविष्कार संशोधन स्पर्धेमधील विजेत्यांच्या सत्कार समारंभ प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. स्पर्धा दोन दिवस चालली. यामध्ये संशोधन लेख व पोस्टर्स सादर करण्यात आले होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजीचे प्रभारी संचालक प्रा. किरणकुमार शर्मा यांनी केले. स्वागत विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. पी. टी. गायकवाड यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. किरण पवार यांनी केले. डॉ. प्रमोद पाटील यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

13 DEC 2022 पुण्यनगरी

# देशासाठी शिक्षणतज्ज्ञांनी एकत्र यावे : डॉ. शिंदे

**कोल्हापूर :** शिक्षणतज्ज्ञांनी एकमेकांशी स्पर्धा करण्यापेक्षा एकत्र येऊन देशासाठी आपले योगदान दिले पाहिजे, असे मत शिवाजी विद्यापीठाचे रजिस्ट्रार डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी व्यक्त केले. भारत सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागातर्फे शिवाजी विद्यापीठात आयोजित स्तुती कार्यक्रमाच्या समारोपाप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी तळसंदे येथील डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. के. प्रतापन होते.

विद्यापीठातील सैफ डीएसटी-सीएफसी विभागात दि. ५ ते ११ डिसेंबर दरम्यान हा प्रशिक्षण उपक्रम घेण्यात आला. स्टार्टअप इंडिया आणि स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवाअंतर्गत देशातील वेगवेगळ्या नामांकित संस्थांतून आलेल्या संशोधकांना या विभागामधील अत्याधुनिक उपकरणांची प्रत्यक्ष प्रात्यक्षिके देण्यात आली, तसेच देशातील नामवंत प्राध्यापक, वैज्ञानिक यांचे बहुमोल मार्गदर्शन मिळाले.

या प्रशिक्षणाच्या शेवटच्या दिवशी मुंबई विद्यापीठाचे डॉ. प्रदीप सरवदे यांनी ट्रान्समिशन इलेक्ट्रॉन मायक्रोस्कोप या उपकरणाविषयी सविस्तर माहिती दिली. या व्याख्यानमालेतील शेवटचे पुष्प गुंफताना शिवाजी विद्यापीठाच्या नॅनो टेक्नॉलॉजी विभागाचे डॉ. टी. डी. डोंगळे यांनी इलेक्ट्रिक मेजरमेंट टेक्निक्स अर्थात विद्युत मापन तंत्रे याविषयी मोलाचे मार्गदर्शन केले. गेले ७ दिवस या व्याख्यानमालेतून दिल्ली, बेंगलोर, मुंबई अशा प्रकारे देशातील विविध भागातून एकूण १४ तज्ज्ञांची व्याख्याने झाली.

सूत्रसंचालन सत्यशीला घोंगडे आणि प्रज्ञा राजे यांनी केले. डॉ. मकसूद वाईकर यांनी आभार मानले. यावेळी सायन्स अँड टेक्नॉलॉजीचे प्रा. एस. एच. ठकार, डॉ. टी. डी. डोंगळे, डॉ. के. डी. पवार, आदिती गर्गे, अजित कांबळे, विजया इंगळे, सुप्रिया साठे, गायत्री पवार उपस्थित होते.

पुढारी

# लोकमाध्यमातील ज्ञानाचे जतन करणे आवश्यक : मोरे

## पत्रकारिता अधिविभागात संवादाचे प्रभावी साधन कार्यशाळेचे उद्‌घाटन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

लोकमाध्यमात असलेल्या ज्ञानाचे जतन आणि संवर्धन करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या मराठी अधिविभागाचे प्रमुख प्रा. डॉ. नंदकुमार मोरे यांनी केले.

जर्नालिझम आणि मास कम्युनिकेशन विभागाच्या वतीने आयोजित 'संवादाचे प्रभावी साधन-लोकमाध्यमे' या कार्यशाळेच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते.

प्रा. मोरे म्हणाले, लोकसमूहाचा आवाज प्रस्थापित यंत्रणेपर्यंत पोहोचविण्याचे काम त्याकाळी याच लोकमाध्यमांनी केले. संत तुकारामांची गाथा, कबीरांचे दोहे, अण्णाभाऊ साठे यांची शाहिरी, गाडगेबाबांची कीर्तने आणि ज्ञानेश्वरांच्या ओव्यांनी समाज प्रबोधन केले. ही सर्व लोकमाध्यमे आहेत. भजन : संवादचे माध्यम या विषयावर सुनीलकुमार सरनाईक यांनी मार्गदर्शन केले. विभागप्रमुख प्रा. डॉ. निशा पवार यांनी प्रास्ताविक केले. डॉ. शिवाजी जाधव यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. विभागाची विद्यार्थिनी पल्लवी पाटील हिने आभार मानले. याप्रसंगी डॉ. सुमेधा साळुंखे, जर्नालिझम आणि मास कम्युनिकेशन विभाग, मराठी विभाग, पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाचे विद्यार्थी उपस्थित होते.

सकाळ

# शिवाजी विद्यापीठात आरोग्य शिबिर

कोल्हापूर : विद्यापीठातील आजीवन अध्ययन व विस्तार विभागात जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभाग सीपीआरतर्फे एड्स विषयकजाणीव जागृती याविषयावर व्याख्यान व आरोग्य शिबिर झाले. डॉ. दीपक सावंत यांनी एच. आय. व्ही एड्सबाबत व त्यावरील प्रतिबंधात्मक उपायाबाबत माहिती दिली. सीपीआरच्या योगी डांगे, सारंग परीट, वेदांत कोळपकर यांनी मधुमेह तपासणी व डोळे तपासणी केली. आजीवन अध्ययन व विस्तार अधिविभागाचे संचालक डॉ. रामचंद्र पवार, सहाय्यक प्राध्यापक डॉ. सुमन बुबा, उदय घाटे, असावरी कागवाडे उपस्थित होत्या. अरविंद पालके यांनी प्रास्ताविक केले.

सकाळ

# 'लोकविद्या, लोकसंस्कृती'वर कार्यशाळा

**कोल्हापूर :** "लोकसाहित्याच्या निर्मितीमागे समूह मनाची प्रेरणा काम करते. त्यामुळे सामाजिक, सांस्कृतिक आशय शब्द साहित्यातून शोधला पाहिजे. लोकसाहित्याचं संचित व्यक्तीचं न राहता समूह मनाचं होतं", असे डॉ. मुकुंद कुळे यांनी सांगितले. शिवाजी विद्यापीठातील राजर्षी शाहू लोकविद्या आणि लोकसंस्कृती अभ्यास केंद्र आयोजित 'लोकविद्या आणि लोकसंस्कृतीः अभ्यास आणि संवर्धन' या विषयावरील एकदिवसीय कार्यशाळेत ते बोलत होते. डॉ. नीला जोशी म्हणाल्या, 'लोकजीवन, लोकमानस, लोकश्रद्धा यांचे संवर्धन करण्याची गरज आहे.' डॉ. रणधीर शिंदे प्रमुख उपस्थित होते. प्रस्ताविक अभ्यासकेंद्राचे प्रमुख प्रा. डॉ. नंदकुमार मोरे यांनी केले. सूत्रसंचालन सुस्मिता खुटाळे यांनी केले. आभार डॉ. सुखदेव एकल यांनी मानले.

13 DEC 2022 पुढारी जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# स. ब. खाडे महाविद्यालय कोपार्डे अजिंक्य

**शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय फुटबॉल स्पर्धा**



कोल्हापूर : फुटबॉल स्पर्धेचे अजिंक्यपद पटकाविणारा कोपार्डे येथील स. ब. खाडे महाविद्यालयाचा संघ. सोबत प्रशिक्षक-मार्गदर्शक.

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कराड येथील डॉ. दौलतराव आहेर इंजिनिअरिंग कॉलेजच्या मैदानावर झालेल्या शिवाजी विद्यापीठाच्या आंतरविभागीय पुरुष फुटबॉल स्पर्धेत कोपार्डे (ता. करवीर) येथील स. ब. खाडे महाविद्यालयाने चौथ्यांदा विजेतेपद प्राप्त केले. अंतिम सामन्यात त्यांनी कोल्हापूरच्या महाविद्यालयाचा एकमेव गोलने पराभव केला. विजयी गोलची नोंद केवल कांबळे याने सामन्याच्या १५ व्या मिनिटाला केली.

स्पर्धेत कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यातील १२ संघ सहभागी झाले होते. विजयी संघात निखिल कांबळे, प्रथमेश बाटे, केवल कांबळे, ऋषिकेश सडोलीकर, रोहन दाभोळकर, अनिल जानकर, स्वप्निल गायकवाड, आरबाज पेंढारी (कर्णधार), ओंकार लायकर, श्रीकांत माने, प्रथम भोसले, आदित्य साळोखे, संकेत जरग, साहिल पेंढारी, आदित्य लायकर, सिद्धेश साळोखे, प्रथमेश गावडे, करणसिंह पाटील, चंदन गवळी, सागर पोवार यांचा समावेश आहे. सर्वांना प्राचार्य व्ही. एम. सूर्यवंशी, शिक्षक आमदार प्रा. जयंत आसगावकर व प्रशिक्षक प्रा. डॉ. अभिजित वणिरे, संस्थेचे अध्यक्ष यशवंतराव खाडे आदींचे मार्गदर्शन लाभले.

पुण्यनगरी

# वेटलिफ्टिंग स्पर्धेत देवचंदचे यश

**करड्याळ : प्रतिनिधी**

शिवराज महाविद्यालय गडहिंग्लज येथे झालेल्या शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय वेटलिफ्टिंग स्पर्धेत देवचंद महाविद्यालय अर्जुननगरच्या खेळाडूंनी ३ सुवर्णपदक, २ रौप्यपदक तसेच १ कास्यपदक पटकावले.

विजयी खेळाडू पुढीप्रमाणे - अखिलेश मोटे -७३ किलो वजनी गट-सुवर्णपदक, अंकित खुरपे-१०२ किलो वजनी गट-सुवर्णपदक, स्नेहल व्हराटे -८१ किलो वजनी गट-सुवर्णपदक, अब्दुलसमद सय्यद-८१ किलो- रौप्यपदक, आरती पाटील-५५ किलो वजनी गट-रौप्यपदक, तेजस्विनी तोरसकर-७३ किलो वजनी गट-कास्यपदक पटकावले. विजयी खेळाडूंना जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष आशीष शाह, उपाध्यक्षा डॉ. तृप्ती शाह, सुबोध शाह यांचे प्रोत्साहन लाभले. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रशांत शाह, उपप्राचार्य डॉ. जी. डी. इंगळे, प्रशिक्षक प्रा. रवींद्र चव्हाण, क्रीडा शिक्षक प्रा. निरंजन जाधव, अनंत घोळवे, संतोष वागळे, वैभव सोनार यांचे प्रोत्साहन लाभले.